महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /2020/3001
दिनांक 14 DEC 2020

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषय:- महा-डीबीटी पोर्टलवरील योजनांच्या कार्यवाहीसाठी वाढीव मुदतीबाबत......

संदर्भ :- मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.18/तंशिसं/डीबीटी-पोर्टल-2020/385/ दि. 09/12/2020

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2019-20 करिता विद्यार्थ्यांच्या अर्जावर कार्यवाही करून अर्ज निकाली काढण्यांकरिता संस्थांना दि. 14/12/2020 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. महाडिबीटी पोर्टलवर वेळोवेळी जाहीर केलेल्या वेळापत्रकांनुसार प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करून विहीत मुदतीत मंजुरीस्तव पाठविण्यांबाबत आपणांस वारवांर पत्राव्दारे, व्हॉटसॲप मॅसेज व्दारे, तसेच दुरध्वनी व्दारे कळविण्यांत आलेले आहे. परंतु या विभागांतर्गत येत असलेल्या संस्थांच्या लॉगीन मध्ये शेवटच्या तारखेपर्यंत प्रलंबित विद्यार्थी असल्याचे उपरोक्त संदर्भियांन्वये निर्दशनास आलेले आहे.

याव्दारे आपणांस पुनःश्च कळविण्यांत येते की, **आपल्या लॉगीन मध्ये प्रलंबित असलेले अर्ज आज दि. 14/12/2020 पर्यत न चुकता ऑनलाईनरित्या मंजुरीस्तव पाठविण्यांत यावे.**

**दि. 14/12/02020 नंतर जर संस्थांच्या लॉगीन मध्ये अर्ज प्रलंबित असल्यास त्याबाबतची माहिती विद्यार्थीनिहाय प्रलंबित राहिल्याचे कारण नमूद करून त्याचा खुलासा या कार्यालयास तात्काळ सादर करण्यांत यावा. जेणे करून संस्थास्तरांवर प्रलंबित असलेल्या अर्जाची माहिती संचालनालयास सादर करणे शक्य होईल.**

**तसेच अंतिम मुदती नंतर Sent Back अंतर्गत व तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज सिस्टिमव्दारे Automatic नामंजूर करण्यांत येतील व याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील , याची नोंद घेण्यात यावी.**

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर